जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (महसूल शाखा) - ४११००१

E-mail Id - mahsulpune१@gmail.com Ph. No. ०२०-२६१११४८०४

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
(महसूल शाखा)
क्र. खेड/एनए/एसआर/ ४८/२०१७
पुणे दि.२० / २ /२०१९

प्रति,

**तहसिलदार खेड,**
**ता. खेड, जि.पुणे**

**विषयः- जमिन अकृषिक झाल्याची नोंद संबंधित जमिनीच्या ७/१२ सदरी घेणे बाबत. मौजे कडुस, ता. खेड, जि. पुणे येथील ग.नं. १६२५ पै मधील ४३००.०० चौ.मी. क्षेत्रापैकी रत्याखालील ३६१.९६ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरीत ३९३८.०४ चौ.मी. क्षेत्रास मंगल कार्यालय (वाणिज्य) प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ (ब) अन्वये अकृषिक आकारणी करून मिळणे बाबत.**

**संदर्भः-१) अर्जदार श्री. चंद्रकांत पंढरीनाथ जाधव व इतर रा. कडूस, आगरमाथा, ता. खेड, जि. पुणे यांचा दिनांक. ७/२/२०१९ रोजीचा अर्ज**

२) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील दि.०५/०१/२०१७ रोजीची अधिसुचना

३) शासन परिपत्रक क्र.एनए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दिनांक.१९ ऑगस्ट २०१७

४) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानमर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.डीपी/ बीकेएच/KHE/शाखा-१/ मौ. कडूस/ ग. नं. १६२५/ प्र.क्र. ६८२/१७-१८, दि. २/२/२०१९ रोजीचे पत्र.

२/- उपरोक्त नमुद विषयान्वये, शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे, **मौजे कडुस, ता. खेड, जि. पुणे येथील ग.नं. १६२५ पै मधील ४३००.०० चौ.मी. क्षेत्रापैकी रत्याखालील ३६१.९६ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरीत ३९३८.०४ चौ.मी. क्षेत्रास मंगल कार्यालय (वाणिज्य) प्रयोजनार्थ** जमिन अकृषिक झाल्याची नोंद संबंधित जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ सदरी घेणेबाबत अर्जदार **श्री. चंद्रकांत पंढरीनाथ जाधव व इतर रा. कडूस, आगरमाथा, ता. खेड, जि. पुणे** यांनी संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये या कार्यालयाकडे विनंती अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांनी विनंती केलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे/गट/सिटी सर्व्हे नं. |
|---|---|---|---|
| १ | कडूस | खेड | १६२५ |
| | जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं./गट नं. | प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी) |
| १ | सखुबाई पंढरीनाथ जाधव<br>नंदकुमार पंढरीनाथ जाधव | १६२५ | ४३००.०० |

| | | |
|---|---|---|
| | चंद्रकांत पंढरीनाथ जाधव | |
| एकूण क्षेत्र | | ४३००.०० |
| रेखांकन/बांधकाम नकाशामध्ये समाविष्ठ क्षेत्र | | ४३००.०० |
| (-) रस्त्या रुंदीने व्याप्त क्षेत्र रोड वायडींग क्षेत्र | | ३६१.९६ |
| वापरात बदलाचे क्षेत्र | | ३९३८.०४ |
| वापरात बदलाचे प्रयोजन | | मंगल कार्यालय (वाणिज्य) |

३/- प्रकरणी या कार्यालयाकडील पत्र क्र. खेड/ एनए/ एसआर/ ४८/२०१७, दिनांक २०/१/२०१८ अन्वये खालीलप्रमाणे अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा करणेबाबत अर्जदार यांना कळविणेत आलेली रक्कम ही ४३००.०० चौ.मी. क्षेत्रावर कळविण्यात आलेली होती.

त्यानुसार अर्जदार यांनी अकृषिक सारा, रुपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबतचे चलन अर्जदार यांनी दिनांक १६/२/२०१८ रोजी ग्रास प्रणालीव्दारे शासन जमा केले आहे.

४/-तसेच विषयांकीत मिळकतीवरील रेखांकन/बांधकाम नकाशास महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी त्यांचेकडील जा.क्र. डीपी/ बीकेएच/KHE/शाखा-१/ मौ. कडुस/ ग. नं. १६२५/ प्र.क्र. ६८२/१७-१८, दि. २/२/२०१९ अन्वये दिलेल्या प्रांरभ प्रमाणपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे. त्यानुसार अर्जदार यांनी रेखांकनात समाविष्ठ केलेले ४३००.०० चौ.मी. क्षेत्रापैकी ३६१.९६ चौ.मी. रस्त्याचे क्षेत्र वजा जाता उर्वरीत ३९३८.०४ चौ.मी. क्षेत्रास मंगल कार्यालय (वाणिज्य) प्रयोजनार्थ बांधकाम आराखडे मंजुर केलेले आहेत.

सबब, आपणास या पत्रान्वये कळविणेत येते की, शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे विषयांकीत नमुद मिळकत अकृषिक झालेबाबतची योग्य ती नोंद नमुद मिळकतीचे ७/१२ सदरी घेण्याकामी फेरफार घेण्यासंदर्भात कार्यवाही करण्यास तसेच त्यानुसार गाव नमुना नं. २ अद्यावत करुन दुरुस्त अधिकार अभिलेखाची प्रत व फेरफार अर्जदारास उपलब्ध करुन देणेबाबत संबंधित गांव कामगार तलाठी कडुस, ता. खेड यांना आपले स्तरावर कळविण्यात यावे. तसेच विषयांकीत मिळकत अकृषिक झालेबाबतची नोंद नमुद मिळकतीचे ७/१२ सदरी व गाव नमुना नं. २ ला घेणेची कार्यवाही संबंधित गाव कामगार तलाठी यांचे स्तरावरुन झाली किंवा कसे? याची पडताळणी आपले स्तरावरुन करणेत येऊन तद्नंतर प्रस्तुतची नोंद तालुका नमुना नं. २ ला घेणेकामी योग्य ती कार्यवाही करावी.

सोबतः- आपले कार्यालयाचे अभिलेखात जतन करणेकामी मुळ संचिका पान क्र. १ ते १४८ जोडली असे.

मा.अपर जिल्हाधिकारी सो.
यांचे मान्यतेने

सही/-
(प्रल्हाद हिरामणी)
तहसिलदार महसूल
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

प्रतः- १) श्री. चंद्रकांत पंढरीनाथ जाधव व इतर
रा. कडूस, आगरमाथा, ता. खेड, जि. पुणे

२)महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र प्राधिकरण, सयाजीराव गायकवाड, उद्योग भवन औंध पुणे-०७

३) गाव कामगार तलाठी मौजे कडुस, ता. खेड, जि.पुणे

४) राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११००१ यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

(प्रल्हाद हिरामणी)
तहसिलदार महसूल
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे